# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक २४४/२०२४** **दिनांक :- २९/०६/२०२४**

## “बलात्काराच्या गुन्हयातील १ वर्षापासुन फरारी असलेल्या आरोपीतास पकडण्यात गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांना यश ”

नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I १९९/२०२३ भादविस ३७६, ३७६(२)(एन), ५०६ प्रमाणे या गुन्हयातील आरोपीत इसम नामे अतुल यादव रा. नायगाव पुर्ण नाव व पत्ता माहीत नाही याने गुन्हयातील पिडीत फिर्यादी महीला (नाव पत्ता) यांना त्याची मैत्रिणीस भेटण्याकरीता नेण्याचा बहाणा करुन मुंबई अहमदाबाद महामार्गावरील बाफाणे, नायगाव पुर्व येथील एस.पी.हॉटेल येथे नेले. तेथे नेल्यानंतर आरोपीत याने पिडीत फिर्यादी महीलेस कोणते तरी गुंगीकारक पदार्थ मिश्रीत ज्युस पाजुन त्यांच्या इच्छेविरुध्द जबरदस्तीने शरीर संभोग करुन त्याचा व्हिडीओ बनविला. त्यानंतर तो व्हीडीओ सोशल वेबसाईटवर व्हायरल करण्याची धमकी देत जुन २०२२ ते ११/०७/२०२३ पर्यंत पिडीत महीलेसोबत बाफाणे नायगाव परीसरातील वेगवेगळया हॉटेलमध्ये तसेच दहीसर पुर्व येथील हॉटेलमध्ये नेवून जबरदस्तीने शारीरीक संभोग केलेबाबत फिर्यादी यांनी दिनांक १४/०७/२०२३ रोजी २०.०२ वाजता दिलेल्या तक्रारीवरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गेल्या १ वर्षापासुन उघडकीस न आलेल्या नमुद गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपास चालू करण्यात आला. गुन्हयाच्या समांतर तपासादरम्यान गुन्हयातील आरोपीत याचे पुर्ण नाव व पत्ता उपलब्ध नसल्याने गुन्हयातील आरोपीताचे शोधास उपयुक्त माहीती प्राप्त करण्याचे अनुषंगाने फिर्यादी व गुन्हयांचे घटनास्थळ असलेल्या हॉटेलधारक साक्षीदार व्यक्तींकडुन आरोपीताबाबत माहीती प्राप्त करण्यात आली. आरोपीताचे उपलब्ध अपुर्ण नाव पत्याचे आधारे निरंतर सातत्याने तपास करीत गुप्त बातमीदाराकरवी आरोपीताचे मोबाईल नंबर प्राप्त करुन त्याचे तांत्रीक विश्लेषणातुन आरोपीताचा ठावठिकाणा निष्पन्न करुन आरोपीत नामे अतुलकुमार जयप्रकाश यादव, वय-२५ वर्ष, रा. रुम नं १४४, अँटॉपहील चर्चजवळ, सायन पुर्व, मुंबई यास शिताफिने ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सागर प्रकाश शिंदे, सहाफौज/ रमेश भोसले, सहाफौज/संजय नवले, पोहवा/०००१५ रविंद्र पवार, पोहवा/०३०७६ प्रफुल्ल पाटील, पो.हवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/ ०६०२५ सचिन पाटील, पो.हवा./०५०३३ जगदीश गोवारी, पोहवा/ ०६१०७ रमेश आलदर, पोहवा/१२०४७ दादा आडके, पोहवा/१२०५३ सुधीर नरळे, पोना/०३०३२ प्रशांतकुमार ठाकुर, पो.कॉ./१२०९७ अमोल कोरे, मसुब/रामेश्वर

केकान, मसुब/अविनाश चौधरी तसेच सहाफौज/ संतोष चव्हाण नेम- सायबर शाखा यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.




---------------00000000---------------